महाराष्ट्र शासन

क्र. मजीअ २०१७/प्र.क्र.५७/यो.३
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १ मार्च, २०१६.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय : सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण य्धोजनेअंतर्गत व्याज अनूदान वितरण करण्याची कार्यपध्दती.**

राष्ट्रीय राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या व केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वयंसहाय्यता समुहांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी शासन निर्णयान्वये सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना राबविण्याकरीता महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. मजिअ-२०१६/प्र.क्र.३१/योजना-३, दि. १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा. सचिव, ग्रामविकास व पंचायतराज यांच्या स्वाक्षरीने प्रसिध्द करण्यात आला आहे.

**पात्र स्वयंसहाय्यता समूह:**

१. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना व केंद्रशासनाकडून व्याज अनुदानास पात्र असलेल्या NRLM Compliant महिला स्वयंसहाय्यता समूह करीता ही योजना लागू आहे.
२. सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना ही महिला स्वयंसहाय्यता समूहांना प्रभावी ०% व्याजदरांना कर्ज पूरवठा करण्याकरीता सुरु करण्यात आलेली आहे.

**व्याज अनुदान वितरण कार्यपध्दती:**

व्याज अनूदानाच्या परिगणनेसाठी रिजर्व बँक ऑफ इंडिया द्वारे विहित कार्यपध्दती / मार्गदर्शक सूचनांना अनूरुप कार्यपध्दती खालीलप्रमाणे प्रसारीत करण्यात येत आहे.

अ) प्रवर्ग १ (Category -१) यामध्ये पुढील १४ जिल्ह्यांचा समावेश होतो.

१. गोंदिया, २. गडचिरोली, ३. नंदूरबार, ४. यवतमाळ, ५. उस्मानाबाद, ६. जालना ७. सोलापूर, ८. रत्नागिरी ९. बीड, १०. ठाणे, ११. पालघर, १२. सिंधुदूर्ग १३. चंद्रपूर, १४. वर्धा या जिल्ह्यांमधील महिला स्वयंसहाय्यता समूहांना बँकेमार्फत ७% व्याजदर आकारण्यात येतो. नियमित

परतफेड करणाऱ्या स्वयंसहाय्यता समूहांना केंद्रशासनाकडून ३% व्याज अनुदान प्राप्त होते. अशा स्वयंसहाय्यता समूहला ४% व्याज अनुदान राज्यशासनाकडुन देण्यात येईल.

**ब) प्रवर्ग २ (Category -२) मधील जिल्ह्यांकरीता** - प्रवर्ग १ मधील जिल्ह्ये वगळता उर्वरित २० जिल्हयांकरीता महिला स्वयंसहाय्यता समूहना बँकेमार्फत सर्वसाधारणत: १२.५% व्याजदर आकारण्यात येतो. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना महिला स्वयंसहाय्यता समूहाला NRLM अभियांनाकडून ५.५% व्याज अनुदान देण्यात येते. अशा स्वयंसहाय्यता समूहला ७% पर्यत व्याज अनुदान राज्यशासनाकडुन देण्यात येईल.

**अंमलबजावणी :**

या योजनेची अंमलबजावणी राज्यस्तरावर, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत आणि तालूका स्तरावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचेमार्फत करण्यात येणार आहे. अशा आशयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद यांना मार्गदर्शक सुचनांचे पत्र क्र. जा.क्र. उमेद-एमएसआरएलएम/आर्थिक समावेशन/८४/२०१६, दि. १६/०१/२०१७ रोजी पाठविले आहे.

सर्व जिल्ह्यासाठी (इन्टेंसिव्ह व नॉन-इन्टेंसिव्ह) नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी प्रकल्प संचालक, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, आणि लेखाधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यांची राहील.

इंटेन्सिव्ह जिल्ह्यांमध्ये, इंटेन्सिव्ह ब्लॉकसाठी अंमलबजावणी करीता जिल्हा अभियान व्यवस्थापक, अभियान व्यवस्थापक-आर्थिक समावेशन (DM-FI) तालूका व्यवस्थापक- आर्थिक समावेशन (BM-FI) यांनी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना सहकार्य करावे व त्या क्षेत्रांसाठी त्यांची जबाबदारी राहील.

**व्याज अनुदान वितरण पध्दतीची अंमलबजावणी राज्यामध्ये पुढीलप्रमाणे करण्यात यावी.**

१. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने जिल्हास्तरावर एका बँक शाखेमध्ये Project Director, DRDA, सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना (SSUMSY) या नावाने बचत खाते उघडावे. असे खाते उघडल्यानंतर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने पुढील नमुन्यामध्ये राज्य अभियान कार्यालयाकडे त्वरीत माहिती कळवावी.

| जिल्ह्याचे नाव | बँकेचे नाव | बँक शाखेचे नाव | खात्याचे नाव | बचत खाते क्रमांक | IFSC कोड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

सदर खाते हाताळण्याचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांना असतील. राज्यअभियान कक्षाकडून वरील खात्यात व्याज अनुदानासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

२. जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तालूकास्तरावरील गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मार्फत सर्व बँकाच्या संबंधीत शाखांना व्याज अनुदान मागणीचे फॉर्म वितरीत केले जातील. यासाठी प्रवर्ग १ मधील जिल्ह्यांकरीता आणि प्रवर्ग २ जिल्ह्यांकरीता बँक शाखांना दि. ३ मार्च, २०१७ पर्यंत वितरीत करावे.

**सोबत : (Annexure १ आणि Annexure २)**

३. Annexure १ आणि Annexure २ हे व्याज अनुदान Claim Forms आहेत. हे Forms भरुन बँकांकडुन ६ मार्च, २०१७ पर्यंत प्राप्त करुन घ्यावेत.

४. तालूकास्तरावर गटसमन्वयक, विस्तार अधिकारी, तालुका अभियान व्यवस्थापक-आर्थिक समावेशन (BM-FI) प्रभाग समन्वयक यांनी प्रत्यक्ष बँकेत भेटी देवून बँकेने व्याज अनुदान मागणी केलेले SHGs हे NRLM Compliant आहेत का? हे तपासून पहावे. याप्रमाणे तपासलेले अंतीम व्याज अनुदान मागणी फॉर्म्स बँक शाखानिहाय वर्गिकरण करुन जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेकडे Soft Copy आणि Hard Copy स्वरुपात दि. ०७ मार्च, २०१७ पर्यंत जमा करावेत.

५. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने सर्व बँक शाखांची संकलीत झालेली व्याज अनुदान मागणी पत्रांची Soft Copy Schedule (पत्रक) जिल्हास्तरावर सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेच्या बचत खाते उघडलेल्या नोडल बँकेकडे व्याज अनुदान वितरणासाठी संबंधीत दस्ताऐवजासह दि. ०८ मार्च, २०१७ पर्यंत पाठवावी.

६. जिल्हा पातळीवरील बँकेने मागणीपत्राप्रमाणे सर्व बँकांच्या संबंधीत शाखांतील NRLM Compliant SHGs च्या कर्ज खात्यामध्ये व्याज अनुदान NEFT/RTGS द्वारे दि. १५ मार्च, २०१७ रोजी जमा करावी व जिल्हास्तरावरील नोडल बँक SHGs ना व्याज अनुदान वितरीत केल्याबद्दलची SHG निहाय, बँक शाखा निहाय माहिती प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना दि. १७ मार्च, २०१७ पर्यंत कळवेल. **सोबत Annexure ३**

७. संकलीत झालेली जिल्ह्याची माहिती प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा राज्य अभियान कक्षाला २० मार्च, २०१७ पर्यंत कळवेल.

८. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा महिला स्वंयसहाय्यता समुहांना व्याजाचे अनुदान त्यांच्या खात्यात थेट जमा झाल्याबद्दल "सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत देय व्याज अनुदान हे आपल्या खात्यात ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासनाने थेट जमा केले आहे." अशा SMS द्वारे कळविण्यात येईल.

९. प्राप्त माहितीचे राज्यपातळीवरील संकलन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यालय करेल.

१०.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी व्याज अनुदान रकमेचे वितरण वर उल्लेखलेल्या नियोजनाप्रमाणे वेळेवर व्हावे यासाठी कर्मचाऱ्यांना कामाचे वाटप व जबाबादारी नेमून द्यावी.

११.दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१७ या कालावधीचे व्याज अनुदान वितरण एकाच टप्यात सुरुवातीला करायचे आहे. माहे फेब्रुवारी व मार्च २०१७ अखेर या योजनेअंतर्गत देय असलेले व्याज अनुदान हे माहे एप्रिल २०१७ मध्ये (टप्पा २) देण्यात यावे.

१२.माहे एप्रिल २०१७ पासून करावयाच्या व्याज अनूदान वितरण पध्दतीबाबत जिल्ह्यांना स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात येईल.

(व्हि.व्हि.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. विभागीय आयुक्त, सर्व विभाग,
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग(एसबीआय साईड),सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना कार्यवाहीसाठी
५. जिल्हा अभियान व्यवस्थापक (सर्व) यांना कार्यवाहीसाठी

# Annexure 1
## Claim form for NRLM compliant SHGs in Intensive 14 districts
## Consolidated claim form for interest subvention

**Name of Bank :** **IFSC Code:** **Block** **District**

**Consolidated Statement of claims for the period 1st April 2016 to 31st January 2017 for the loans disbured / outstanding up to 3 lacks**

| New accounts opened during the 1st April 2016 to 31st January 2017 | | | Total Outstanding of all NRLM compliant SHGs as on 31st January | | | Amount of interest subvention claimed at the rate of 4% per annum | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Name of SHG | Loan Account No | Outstanding Amount | Name of SHG | Loan Account No | Outstanding Amount | Name of SHG | Loan Account No | Outstanding Amount |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**We certify that the above claimed amount and the accounts are from the Category - I districts only and all the accounts claimed are eligible for interest subvention. We also certify that there is no duplication in the claims and there is no human intervention while submitting the regular claim or additional interest subvention claim from the branch level onwards. In case fo closer of loan amount the interest subvention amount will be credited in saving bank acconts of respective SHGs. The information is given in excel sheet.**

**Seal** **Authorized Signatory**

(7)

## Annexure 2

## Claim form for NRLM compliant SHGs in Non-Intensive 20 districts

## Consolidated claim form for interest subvention

**Name of Bank :** **IFSC Code:** **Block** **District**

**Consolidated Statement of claims for the period 1st April 2016 to 31st January 2017 for the loans disbured / outstanding up to 3 lacks**

| New accounts opened during the 1st April 2016 to 31st January 2017 | | | Total Outstanding of all NRLM compliant SHGs on 31st January | | | Amount of interest subvention claimed of all NRLM Compliant SHGs at the rate of 7% annaum | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Name of SHG | Loan Account No | Outstanding Amount | Name of SHG | Loan Account No | Outstanding Amount | Name of SHG | Loan Account No | Outstanding Amount |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**We certify that the above claimed amount and the accounts are from the Category - II districts only and all the accounts claimed are eligible for interest subvention. We also certify that there is no duplication in the claims and there is no human intervention while submitting the regular claim or additional interest subvention claim from the branch level onwards. In case fo closer of loan amount the interest subvention amount will be credited in saving bank acconts of respective SHGs. The information is given in excel sheet.**

**Seal** **Authorized Signatory**

# Annexure 3

**Information regarding disburesment of intrest subvention amount to NRLM Compliant SHGs**

**Bankwise and Branchwise statement of disbursed intrest subvention** **District :**

**Statement of Intrest subvention amount disburesd for period 1st April 2016 to 31st January 2017**

| Sr. No. | Name of SHG | Loan account No | Amount of intrest subvention credited |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**We certify that as per claimed amount of entire intrest subvention amount in credited in respective loan accounts of NRLM Compliant SHGs**

**Seal**

**Authorized Signatory**
**District level Nodal Bank**